**राज्यामध्ये ठाणबंद पध्दतीने शेळी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पुरक उत्पन्न मिळवून देणे या विशेष राज्यस्तरीय योजनेंतर्गत योजनेस (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजने अंतर्गत) प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : पविआ-२०११/प्र.क्र.७४/पदुम-३,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : २ जुलै, २०११**

**वाचा** - सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.१५.६.२०११ अन्वये दि.१.६.२०११ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे निर्गमित केलेले इतिवृत्त.

**प्रस्तावना –**

राज्याचे सन २००९-१० वर्षातील एकुण मांस उत्पादन ५४५ हजार मे. टन एवढे झाले आहे. यामध्ये गो/ म्हैसवर्गीय जनावरांपासून १४३ हजार मे. टन, शेळ्या / मेंढ्यांपासून ८८ हजार मे. टन, वराह मांस उत्पादन ५ हजार मे. टन आणि कुक्कुट मांस उत्पादन ३०९ हजार मे. टन एवढे आहे. यावरुन स्पष्ट होते की, कुक्कुट मांसाचा एकुण मांस उत्पादनामध्ये वाटा ५७ टक्के एवढा व सर्वात जास्त असा आहे. शेळ्या-मेंढ्यांच्या मांसाच्या तुलनेत कुक्कुट मांस स्वस्त आणि त्यामुळेच सर्वसामान्यांना परवडणारे आहे. सर्वसाधारण अनुमानानुसार राज्यात कुक्कुट मांसाची प्रतिवर्ष आवश्यकता ४८० हजार मे. टन एवढी आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि National Institute of Nutrition यांच्या शिफारशीनुसार राज्यामध्ये पशुजन्य मांसाची (कुक्कुट मांसासह) प्रतिवर्ष अंदाजे १२१० हजार मे. टन एवढी उपलब्धता आवश्यक आहे. प्रत्यक्षात पशुजन्य मांसाची (कुक्कुट मांसासह) प्रतिवर्ष ५४५ हजार मे. टन एवढी उपलब्धता आहे. (सन २००९-१० ची स्थिती) त्यामुळे या योजने अंतर्गत राज्याच्या प्रामुख्याने अविकसित भागांमध्ये अंशतः ठाणबंद पध्दतीने शेळी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पुरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी तसेच नक्षलग्रस्त/ आदिवासी भागात त्याचप्रमाणे इतर ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने दिनांक ०१.०६.२०११ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीत विषयाधिन योजनेस मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यांत येत आहे.

**शासन निर्णय -**

राज्यामध्ये अंशतः ठाणबंद पध्दतीने शेळी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पुरक उत्पन्न मिळवून देणे या विशेष राज्यस्तरीय योजनेंतर्गत योजनेस (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजने अंतर्गत) याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सदरची योजना सन २०११-१२ पासून राबवण्यात यावी.

**योजनेचे स्वरुप (आर्थिक निकष) –**

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना उस्मानाबादी / संगमनेरी जातींच्या अथवा स्थानिक वातावरणात तग धरतील अशा प्रजातींच्या पैदासक्षम १० शेळ्या व १ बोकड याप्रमाणे एका गटाचा एकूण बाबनिहाय खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | दर | १० शेळ्या +१ बोकड रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १. | शेळ्या खरेदी | रू ६,०००/- प्रति शेळी (उस्मानाबादी/संगमनेरी जातीच्या पैदासक्षम)<br>रू ४,०००/- प्रति शेळी (अन्य स्थानिक जातीच्या पैदासक्षम) | रू ६०,०००/- (१० शेळ्या)<br>रू ४०,०००/-(१० शेळ्या) |
| २. | बोकड खरेदी | रू ७,०००/- १ बोकड (उस्मानाबादी/ संगमनेरी जातीचा पैदासक्षम नर)<br>रू ५,०००/- १ बोकड (अन्य स्थानिक | रू ७,०००/- (१ बोकड)<br>रू ५,०००/- (१ बोकड) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जातीचा पैदासक्षम नर) | |
| ३. | शेळ्या व बोकडाच्या विमा (विमा ४ % + १०.३२ % Service Tax) | किंमतीच्या ४ टक्के | रू २,९५७/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी)<br>रू १,९८६/-<br>(अन्य स्थानिक जातींसाठी) |
| ४. | शेळ्यांचे व्यवस्थापन (खाद्य, चारा यावरील खर्च) | लाभार्थीने स्वतः करणे अपेक्षित | -- |
| ५. | शेळ्यांचा वाडा प्रति शेळी १० चौ.फु.<br>प्रति करडु ५ चौ.फु.<br>प्रति बोकड १५ चौ.फु. याप्रमाणे | रू.७०/-चौ.फु.प्रमाणे | रु.१५,७५०/-<br>(२२५चौ.फु. करीता ) |
| ६ | खाद्दयाची व पाण्याची भांडी | - | रु.१,०००/- |
| ७ | आरोग्य सुविधा व औषधोपचार | - | रु.१,१५०/- |
| | **एकूण खर्च** | | **रु. ८७,८५७/-( उस्माना-बादी / संगमनेरी जातीसाठी)**<br>**रु. ६४,८८६/-**<br>**(अन्य स्थानिक जातींसाठी)** |

योजनेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये उस्मानाबादी आणि संगमनेरी या जातींच्या शेळ्या व बोकड यांचे गट वाटप करण्यात येतील. तर कोकण आणि विदर्भ विभागातील जिल्ह्यांमध्ये स्थानिक हवामानामध्ये तग धरणाऱ्या तसेच पैदासक्षम आणि उत्तम स्वास्थ्य असलेल्या स्थानिक जातीच्या शेळ्या व बोकड यांचे गट वाटप करण्यात यावेत.

योजने अंतर्गत खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांना **५० टक्के** अनुदान म्हणजेच १० शेळ्या + १ बोकड या गटासाठी रू. **४३,९२९**/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी) तर रू. **३२,४४३**/- अनुदान (अन्य स्थानिक जातींसाठी) देण्यात येईल. अनुसूचित जाती / जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी **७५ टक्के** अनुदान म्हणजेच १० शेळ्या + १ बोकड या गटासाठी रू **६५,८९३**/- (उस्मानाबादी / संगमनेरी जातीसाठी) तर रू. **४८,६६५**/- अनुदान (अन्य स्थानिक जातींसाठी) अनुज्ञेय राहील.

अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित रक्कम लाभार्थ्यांनी स्वत:/बँकेकडून कर्ज घेवून (सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी किमान १० टक्के स्वहिस्सा व उर्वरित ४० टक्के बँकेचे कर्ज त्याचप्रमाणे अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी किमान ५ टक्के स्वहिस्सा व उर्वरित २० टक्के बँकेचे कर्ज) उभारावयाची आहे. बँक / वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

**<u>लाभार्थी निवडीचे निकष -</u>**

या योजनेमध्ये लाभार्थी निवडीचे निकष खालील प्रमाणे असतील.
सर्वसाधारण प्रवर्गातील तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी.

**प्राधान्यक्रम (उतरत्या क्रमाने)**

१. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी
२. अत्यल्प भूधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भुधारक)
३. अल्प भुधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भुधारक)

४. सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
५. महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र.१ ते ४ मधील)

**लाभार्थी निवड समिती -**

लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीव्दारे करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (राज्यस्तर) | सदस्य |
| ३. | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ४. | जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (राज्यस्तर) | सदस्य |
| ५. | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी | सदस्य |
| ६. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ७. | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | सदस्य सचिव |

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

१. अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सर्वप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात यावेत.

२. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्याने करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबत जोडावयाची इतर आवश्यक कागदपत्रे याचा तपशील, शेळयांच्या वाडयाचा आराखडा आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर निश्चित करून तो क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पाठवावा. तसेच सदर अर्जाचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व  जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावा.

३. लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

४. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी (पविअ-विस्तार) लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारून प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे सादर करावेत.प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी.

५. लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारू नये. सदर अर्जाची वैधता हि त्या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेच्या अधिन असेल तसेच कोणत्याही स्वरूपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राह्य धरण्यात येवू नये. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून एका महिन्याच्या कालावधीत जिल्हा निवड समितीमार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी.

६. जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थीची यादी आयुक्त पशुसंवर्धन तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या कार्यालयाच्या सुचनाफलकावर तसेच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी व निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्याबाबत कळविण्यात यावे.

७. योजनेसाठी लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील असे न केल्यास प्रतिक्षा सुचीवरील पुढील लाभार्थीस या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा.

८. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा. या योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

९. शेळी गट खरेदी खालील समितीद्वारे करण्यात यावी. शेळी गटाची लाभार्थीच्या पसंतीने खरेदी करावी.

**शेळी गट खरेदी समिती :**

- संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती
- बँक प्रतिनिधी
- विमा प्रतिनिधी
- लाभार्थी

१०. या योजनेअंतर्गत उस्मानाबादी / संगमनेरी किंवा स्थानिक जातीच्या पैदासक्षम शेळया / बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे यांचेकडून करण्यात यावी. महामंडळाकडे शेळया / बोकड उपलब्ध नसल्यास शेळयांच्या अधिकृत बाजारातून शेळया / बोकडांची खरेदी करण्यात यावी.

११. या योजनेखाली वाटप केलेल्या शेळी गटाचा लाभार्थी व संबंधित जिल्हयातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नांवे तीन वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा. योजनेत दोन वर्षाच्या विम्यासाठीची तरतूद केलेली असून उर्वरित एका वर्षासाठी लागणारा निधी लाभार्थ्याने अदा करावयाचा आहे.

१२. योजनेमध्ये वाटप केलेल्या शेळया मृत झाल्यास विम्याच्या पैशातून व पशुसंवर्धन विभागाच्या संमतीने लाभार्थ्यांना दुसऱ्या शेळया खरेदी करुन पुरविण्यात याव्यात.

१३. लाभार्थ्याकडे शेळी गट संगोपनासाठी पुरेशी जागा असावी.

१४. शेळी गटाच्या खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

१५. लाभार्थ्याने शेळी / मेंढी पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

१६. लाभार्थ्यास सदरचा व्यवसाय किमान ३ वर्ष करणे आवश्यक राहील.

१७. या योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांकडून घ्यावयाचे बंधपत्र शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवून आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करावा व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित करावा..

१८. या योजनेसाठीचे लेखाशिर्ष व सन २०११-१२ साठी उपलब्ध असलेली आर्थिक तरतूद स्वतंत्रपणे सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

१९. योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीची यादी संबंधित पशुधन विकास अधिकारी (विस्तार), कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांचे स्तरावर उपलब्ध करून द्यावी. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी तसेच कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थांनी लाभार्थीची नोंद शेळी गटाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी व पाठपुरावा करावा.

२०. लाभार्थीने शेळी गटासाठी वितरीत केलेल्या शासकीय अनुदानाचा विनियोग दिलेल्या प्रयोजनासाठीच करणे आवश्यक राहील अनुदानाचा गैर विनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी.

२१. शेळयांचे गट वाटप केलेले लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील असतील त्या तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक यांचे द्वारे सदर शेळी गटास आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीमध्ये घेण्यात यावी. तसेच सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या शेळी गटाची लाभार्थी/पशुपालकाच्या घरी जाऊन १०० टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात यावा.

२२. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण शेळी गटाच्या २५ टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण शेळी गटांपैकी १० टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

२३. पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी ज्या ज्या वेळी शेळी गट पडताळणीसाठी भेट देतील त्या त्या वेळी अधिकाऱ्यांना शेळी गट दाखविणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.

२४. वाटप केलेल्या शेळी गटातील शेळ्या/बोकडांना नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोगप्रतिबंधक लसीकरण करून घेणे, त्यांना जंतनाशके पाजणे ही सर्वस्वी जबाबदारी लाभार्थीची राहील.

२५. या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासून मिळणा-या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवण्यात यावेत तसेच सदर योजनेअंतर्गत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या नोंदी नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवण्यात याव्यात. ही माहिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेमार्फत

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी संकलित करुन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयास सादर करतील.

२६. आर्थिक वर्ष संपल्यानंतर दर सहा महिन्यांनी योजना अमंलबजावणी मुल्यमापन अहवाल संबधीत प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, यांनी आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे अभिप्रायासह सादर करावा. मुल्यमापन अहवाल खात्याचे वार्षिक अहवालामध्ये सुध्दा समाविष्ठ करण्यात यावा

२७. सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी तसेच **आहरण व संवितरण अधिकारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे राहतील.** विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

२८. या योजनेसाठी वित्तीय कर्ज पुरवठ्यासाठीची आवश्यक तरतूद संबंधित जिल्ह्याच्या Potential Linked Credit Plan मध्ये करणेबाबत आयुक्त स्तरावरून सर्व संबंधितांना सुचना देण्यात याव्यात.

२९. सदर योजनेच्या आर्थिक निकषाच्या अधिन राहून योजना यशस्वीपणे राबवण्याकरिता आवश्यक त्या इतर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२८६/११/व्यय-२, दि.३०/६/२०११ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.**२०११०७०२११५५१६००१** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने,**

**स्वाक्षरीत/-**
**(सु. तु. शेंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
६. सर्व मान्ताप्राप्त राजकीय पक्षांचे मध्यवर्ती कार्यालये.
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
११. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२०. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे-१६.
२१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२२. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
२३. विधीमंडळ ग्रंथालय (१० प्रती)
२४. उपसंचालक, लेखा व कोषागार, कोकण विभाग, कोकण भवन, नवीन मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२६. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
२७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
२८. अवर सचिव, पदुम-३/१६, कक्ष अधिकारी पदुम-१, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९. निवड नस्ती